## कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडाचा घटक)

**कोंकण मंडळाच्या सन २०१४, सन २०१६ व सन २०१८ च्या सोडतीमधील पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमत भरण्याकरीता मुदतवाढ देणेबाबत.**

# जाहीर निवेदन

सद्यस्थितीत महाराष्ट्र शासनाने कोविड -१९ हि महामारी (Pandemic) म्हणून घोषित केली. त्यास अनुसरून राष्ट्रीय स्तरावर व राज्य स्तरावर विविध उपाय योजना राबवण्यात आल्या. करोना पार्श्वभूमीवर सन २०१४, सन २०१६ व सन २०१८ च्या सोडतीमधील यशस्वी व पात्र लाभार्थ्यांना विक्री किंमतीचा भरणा विहित मुदतीत करता आलेला नाही. त्यामुळे प्राधिकरणाच्या दि. ०१/०४/२०१७ परिपत्रकातील वेळापत्रकानुसार कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. या संदर्भात दि. १४/०१/२०२१ रोजी मा. उपाध्यक्ष तथा मु.का.अ./ प्राधिकरण यांचे दालनात झालेल्या बैठकिमध्ये घेतेलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने खाली दर्शविल्याप्रमाणे निर्णय कळविण्यात येत आहे.

कोंकण मंडळा अंतर्गत सन २०१४, सन २०१६ व सन २०१८ च्या सोडतीमधील ज्या पात्र लाभार्थींची सदनिका विक्री किंमत भरणेची वैधानिक मुदत कोरोना महामारीच्या टाळेबंदी कालावधी मध्ये संपलेली आहे अशा लाभार्थ्यांना सदनिकेची विक्री किंमत भरण्याकरिता दिनांक १५.१२.२०२० पर्यंत बिनव्याजी मुदतवाढ देण्यात आलेली होती. **सदर मुदतवाढ त्यापुढे दि. १५/०३/२०२१ पर्यंत वाढवून देण्यात येत आहे.**

तरी आपणांस नेमून दिलेल्या संबंधीत बँकेमध्ये विक्री किंमतीचा भरणा तत्काळ व विहित मुदतीत करावा या नंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(Signature) .15/1/2021

(डॉ नितिन महाजन)
मुख्य अधिकारी,
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
मुंबई